# परिपत्रक

No. Exam/DBOEE/ICC/2020-21-02

**विषय : मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९–२०च्या अंतिम सत्र/वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या विविध बॅकलॉग परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

उपरोक्त नमुद विषयाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९–२०च्या अंतिम सत्र/वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या बॅकलॉग परीक्षांच्या आयोजनासाठी विद्यापीठाच्या विविध सक्षम प्राधिकरणांनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व महाविद्यालयांनी खाली नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

1) शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील अंतिम सत्र/वर्षाच्या पदवी, पदव्युत्तर व पदविका या परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थी व त्यांच्या बॅकलॉगच्या परीक्षांसाठी (पदवीसाठी सत्र -१ ते सत्र -५/ सत्र -१ ते सत्र -७/ सत्र -१ ते सत्र -९ – पदवी कालावधी ३, ४ व ५ वर्षेनुसार व पदव्युत्तरसाठी सत्र -१ ते सत्र -३) प्रविष्ट विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज सादर केले असतील त्याच विद्यार्थ्यांना परीक्षा घेण्यात यावी.

2) महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी (उदा. मोबाईल नंबर, ईमेल, PRN क्रमांक, ऑनलाईन परिक्षेबाबत लागणारी साधन सामग्री जसे लॅपटाप, संगणक, स्मार्ट फोन, इंटरनेट, व विद्यार्थी सद्यपरिस्थीतीत कुठे आहे इत्यादी). या परिपत्रका सोबत वरील संदर्भातील मार्गदर्शक नमुना जोडला आहे. तरी महाविद्यालयांनी आवश्यकतेनुसार त्या नमुन्यात योग्य तो बदल करुन विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी तो विद्यार्थ्यांना त्वरीत पाठवावा.

3) ज्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांनी फेब्रुवारी/मार्च, २०२० मध्ये वर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांच्या बॅकलॉगच्या (सत्र–१ ते सत्र-४, सत्र–१ ते सत्र–६, सत्र–१ ते सत्र–८ हे ३, ४, व ५ वर्षाच्या पदवीसाठी व सत्र–१ ते सत्र–२ पदव्युत्तरासाठी) महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षा घेतल्या असतील तर त्या परीक्षा पुन्हा घेण्यात येवू नयेत.

4) मार्च, २०२० मध्ये ज्या महाविद्यालयांतील अंतिम सत्र/वर्षाच्या प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षा घेण्यात आल्या असतील तर त्या पुन्हा घेण्यात येवू नयेत.



Office of the Principal
Indira Institute of Pharmacy, Sadavali.
Inward No - 59
Date - 09/09/2020
Referred To - UM / Exam Cell
Signature - [signature]

To follow up

5) परीक्षांच्या सुयोग्य आयोजनासाठी विद्यापीठाने विद्याशाखांनिहाय (पारंपारिक महाविद्यालय, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षण, विधी, फार्मसी, फाईन आर्टस इ.) महाविद्यालयांचे क्लस्टर्स तयार केलेले आहेत व प्रत्येक क्लस्टर मधील एका महाविद्यालयाने लीड महाविद्यालय म्हणून विद्यापीठाने परीक्षेच्या नियोजनाची निश्चित केलेली जबाबदारी पार पाडावयाची आहे.

6) ज्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठात परीक्षा अर्ज सादर केलेले आहेत, परंतु परीक्षा शुल्क भरलेले नाहीत अशा महाविद्यालयांनी त्वरीत विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क भरावे.

7) विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेले आहेत, त्यांना आसन क्रमांक (Seat Number) देण्यात आलेले आहेत. त्याचा वापर परीक्षा घेण्यासाठी महाविद्यालयांनी करावा.

8) महाविद्यालयांना परीक्षा घेण्यासाठी जे विविध अहवाल (Report) आवश्यक असतात ते MKCL पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तसेच काही परीक्षांचे अहवाल (Report) पारंपारिक पद्धतीने महाविद्यालयांना पाठविण्यात येतील.

9) ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत परीक्षा (Internal Exams / Term work) आहेत त्या परीक्षांच्या गुणांच्या नोंदी महाविद्यालयांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या नसतील तर त्यांनी दिनांक १५ सप्टेंबर २०२० च्या आत सदर गुणांच्या नोंदी कराव्यात.

10) अंतिम सत्रात प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांच्या Lower Exam चे निकाल ऑनलाईन पद्धतीने अपलोड करण्याविषयी कळविण्यात आले होते, परंतु त्यात ज्या महाविद्यालयांनी नोंदी पूर्ण केलेल्या नसतील त्यांनी त्या त्वरीत पूर्ण कराव्यात.

11) अंतिम सत्र / वर्ष किंवा बॅकलॉगच्या Practical, Project, Viva-Voce परिक्षा प्रत्येक महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहाय्याने ऑनलाईन पद्धतीने (Zoom App., Google Meet, Skype इत्यादी मिटींग ॲप्स ) किंवा आवश्यकतेनुसार दुरध्वनीद्वारे मौखिक परिक्षा दिनांक १५ सप्टेंबर २०२० पासून घेण्यात याव्यात. मौखिक परिक्षा घेण्यासाठी प्रश्नसंच तयार करण्यात यावेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील उपस्थिती बाबत नोंदी ठेवण्यात याव्यात. सदर परीक्षांचे गुण हे MKCL पोर्टलवर किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेनुसार त्वरीत अपलोड करण्यात यावेत.

12) ऑनलाईन थेअरी परीक्षेचे वेळापत्रक हे लीड महाविद्यालयाने क्लस्टर मधील महाविद्यालयांशी चर्चा करुन साधारणत: क्लस्टर मधील सर्व महाविद्यलयांच्या परिक्षा हया एकाच वेळी घेण्यात येतील अश्या पद्धतीने तयार करावे व सर्व महाविद्यालयांनी हे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावे.

13) ऑनलाईन थेअरी परीक्षेचे वेळापत्रक तयार करताना दिनांक २५ सप्टेंबर २०२० पासून बॅकलॉग च्या परीक्षा सूरू करण्यात याव्यात व रेग्यूलर परीक्षा दिनांक १ ऑक्टोबर, २०२० पासून सुरू कराव्यात व सर्व थेअरी परीक्षा १७ ऑक्टोबर २०२० पर्यंत संपवाव्यात.

14) अंतिम सत्राच्या सर्व थेअरी परीक्षा दिनांक १३ मार्च २०२० पर्यंत महाविद्यालयात शिकविण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत घेण्यात याव्यात.

15) विद्यापीठ प्राधिकरणांनी ठरविल्याप्रमाणे सर्व थेअरी परीक्षा हया बहुपर्यायी (Multiple Choice Question) प्रश्न देऊन ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत व ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध नसेल त्यांच्यासाठी ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्थानिक प्रशासनाची मदत आवश्यक असल्यास, स्थानिक प्रशासनास विनंती करावी. वरील नमूद केलेले सर्व पर्याय शक्य नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत Offline पद्धतीचा वापर करून परीक्षा घेण्यात येतील.

16) सर्व ऑनलाईन थेअरी परीक्षा हया ५० गुणांसाठी व १ तासाचा कालावधी देऊन घेण्यात येतील.

17) विद्यापीठाचे अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता, व लीड महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली, महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहाय्याने प्रत्येक विषयांसाठी (मराठी/इंग्रजी, आवश्यक त्या माध्यमानुसार) Question Bank तयार करण्यात येईल व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अनेक वेगवेगळे प्रश्नपत्रिकेचे संच (Multiple Question Paper Sets) परीक्षेसाठी उपलब्ध केले जातील.

18) प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या स्तरावर ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठीची तांत्रिक सुविधा निर्माण करावी. तसेच तयारीसाठी व अनुभवासाठी विद्यार्थ्यांना Sample MCQ questions देवून त्यांचा सराव परीक्षा घ्यावी.

19) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन थेअरी परीक्षेसाठी आवश्यक त्या सुविधा देण्यात याव्यात (उदा. २० मिनिटे जास्तीचा वेळ देणे, लेखनिकाची मान्यता देणे इत्यादी).

20) ऑनलाईन पद्धतीने प्रत्येक विषयाची थेअरी परीक्षा झाल्यानंतर प्रत्येक महाविद्यालयाने लगेचच मुल्यांकन प्रक्रिया सुरू करून विद्यार्थ्यांचे गुण तयार करावेत. थेअरी परीक्षेचे मुल्यांकन हे 50 गुणांचे असल्यामुळे संबधित विषयाच्या Maximum (60, 75, 80, 100 इत्यादी) गुणांनुसार रुपांतर करून दोन दिवसांच्या आत विद्यापीठाच्या ऑनलाईन सिस्टीम मध्ये अपलोड करावेत.

21) जे विद्यार्थी काही कारणास्तव ऑनलाईन थेअरी परीक्षा देऊ शकले नाहीत त्यांना पुन्हा संधी देण्याविषयी लीड महाविद्यालयांमार्फत एकत्रित निर्णय घेऊन अश्या विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी उपलब्ध करून दयावी.

22) थेअरी परीक्षा बहूपर्यायी प्रश्नांच्या स्वरूपात घेण्यात येत असल्यामुळे यात विद्यार्थ्यांना निकाल जाहिर झाल्यानंतर पुनर्मुल्यांकनाची (Revaluation) सुविधा देता येणार नाही याची माहिती प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांना दयावी.

23) परिक्षा घेण्यासाठी स्थानिक प्रशासनाची मदत आवश्यक असल्यास संबंधित जिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलीस विभाग व विद्युत विभाग यांच्याशी संपर्क साधून आवश्यक त्या उपाय योजना करुन घ्याव्यात.

24) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात समुपदेशन मिळावे, त्यांना येणा-या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन व्हावे तसेच परिक्षेचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नपत्रिका आणि नवीन पद्धतीने घेण्यात येणा-या परीक्षांबाबत स्वयंस्पष्ट माहिती मिळावी यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने योग्य ती व्यवस्था करावी.

25) महाविद्यालयांच्या प्राचार्यांना काही शंका/समस्या असल्यास त्यांनी संबधित क्लस्टरच्या लीड महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधून त्यांना याबातीत कळवावे व लीड महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठाचे संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ /क्लस्टर निहाय संबधित विद्याशाखांचे अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता यांच्याशी संपर्क साधून सदर शंका/समस्यांचे निरसन करावे.

वरील सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करून विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत व वेळेत पार पडतील याबाबत सर्व प्राचार्यांनी दक्षता घेवून विद्यापीठास सहकार्य करावे.

ठिकाण : मुंबई -४०००३२
दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२०

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१ मुंबई विद्यापीठाशी संलग्नित / संचलित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक.

२ स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र—कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ ५) वित्त व लेखा अधिकारी.

# Student information format

- Student Name: ________________
- PRN No: ________________
- Program Category : (B.Com/M.Com./ BA/MA/BSc/MSc etc.) ________________
- Email address : ________________
- WhatsApp No: ________________
- Parent/Guardian Contact Number : ________________
- Do you Have ? ( Yes / No )

  a. Smartphone

  b. Laptop/Tab

  c. Desktop

  d. Internet Connectivity

  e. Any other gadget

- Can you arrange Mobile or Laptop for Exam in case of non-availability? ( Yes / No )
- Your current Location details:

  1. City/Town/Village: ________________

  2. Taluka: ________________

  3. District: ________________

  4. State: ________________

  5. If you are out of town, when are you coming back? ________________

- Differently Abled? ( Yes / No )

  If yes, facilities required as per Examination Rules: ________________

  ________________

- If you have ATKT of Lower examinations, please give details: ________________

  ________________